# महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग
## जिल्हा परिषद औरंगाबाद अंतर्गत आरोग्य विभागाकडील ४ संवर्गाची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात क्रमांक ०१/२०२१

महाराष्ट्र शासनाचे ग्राम विकास विभागाकडील पत्र क्र. संकीर्ण/ २०१८/ प्रक्र२४११/ आस्था-८, दिनांक ३१ डिसेंबर २०१८ व ०१ जानेवारी २०१९ चे पत्रानुसार ग्राम विकास विभागाकडील १८ संवर्गातील पदांचा भरतीयोग्य पदामध्ये समावेश करून पदभरती करण्यास मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार जिल्हा परिषद औरंगाबादच्या अखत्यारीतील १४ संवर्गातील रिक्त पदे भरणे करीता महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक संकिर्ण -२०१८/ प्र. क्र.२०/ आ.पु.क. दिनांक १६ मे २०१८, व वित्त विभागाकडील शासन परिपत्रक दिनांक २८ डिसेंबर, २०१८ अन्वये पदभरतीस मान्यता दिल्यानुसार दिनांक ०३ मार्च २०१९ रोजी दैनिक दिव्य मराठी, दैनिक महाराष्ट्र टाईम्स मराठी, दैनिक लोकविजय, दैनिक लोकसंग्रह, साप्ताहिक युवकझुंज या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करून www.mahapraiksha.gov.in या संकेतस्थळावर अर्ज मागविण्यात आले आहेत. जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागाशी संबधित आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता, व आरोग्य पर्यवेक्षक या ५ संवर्गातील माहे, मार्च २०१९ मध्ये दिलेल्या जाहिराती मधील नमूद सर्व रिक्त पदांची भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर जाहिराती शिवाय नव्याने भरावयाच्या रिक्त पदांचा तपशील खालील प्रमाणे -

**अ) शारीरिकदृष्टया दिव्यांग व्यक्तीसाठी ४ टक्के आरक्षण व दिव्यांगाचे नवीन प्रवर्ग निश्चित करण्यात आल्यानुसार खालील प्रमाणे आरक्षीत पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहे.**

<table>
<tr><th rowspan="2">अ क्र</th><th rowspan="2">संवर्ग</th><th rowspan="2">दिनांक ३/३/१९ च्या जाहिराती मध्ये दर्शविलेले एकूण पदे</th><th colspan="10">पैकी दिव्यांगासाठी राखीव ४ टक्के पदे</th><th rowspan="2">गट</th><th rowspan="2">दिव्यांगाचा प्रकार</th><th rowspan="2">राखीव पद संख्या</th></tr>
<tr><th>अ.जा.</th><th>अ.ज.</th><th>वि.जा.(अ)</th><th>भज (ब)</th><th>भज (क)</th><th>भज (ड)</th><th>इ.मा.व.</th><th>वि.मा.प्र.</th><th>इ.डब्ल्यु.एस.</th><th>खुला</th></tr>
<tr><td rowspan="5">१</td><td rowspan="5">आरोग्य सेवक (महिला) १०० टक्के</td><td rowspan="5">१८९</td><td colspan="10" rowspan="5">९</td><td>अ</td><td>अल्पदृष्टी<br>Low vision</td><td>३</td></tr>
<tr><td>ब</td><td>कर्णबधीरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता<br>Deaf (D), Hard of Hearing (HH)</td><td>२</td></tr>
<tr><td>क</td><td>मेंदूचा पक्षघात Cerebrel Palsy (CP)<br>कुष्ठरोग मुक्त Leprosy Cured (LC),<br>शारीरिक वाढ खुंटणे Dwarfism (Dw),<br>आम्ल हल्लाग्रस्त Acid Attack Victims (AAV),</td><td>१</td></tr>
<tr><td>ड</td><td>विशिष्ट शिक्षण अक्षमता Specific Learning Disability, (SLD)<br>मानसिक आजार Mental Illness (MI)</td><td rowspan="2">३</td></tr>
<tr><td>इ</td><td>वरील अ ते ड मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यांसाठी Multiple Disabilities (MD) involving (a) to (d) above</td></tr>
<tr><td rowspan="3">२</td><td rowspan="3">आरोग्य सेवक (पुरुष) ४० टक्के</td><td rowspan="3">१०</td><td colspan="10">पैकी दिव्यांगासाठी राखीव ४ टक्के पदे</td><td rowspan="3">अ</td><td rowspan="3">अल्पदृष्टी<br>Low Vision</td><td rowspan="3">१</td></tr>
<tr><td colspan="3">भजड</td><td colspan="2">वि.मा.प्र.</td><td colspan="3">इ.डल्यू.एस</td><td colspan="2">खुला</td></tr>
<tr><td colspan="10">१</td></tr>
</table>

| | | | पैकी दिव्यांगासाठी राखीव ४ टक्के पदे | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | इ.डब्ल्यू.एस. | खुला | | | |
| ३ | आरोग्य सेवक (पुरुष) ५० टक्के हंगामी फवारणी | ५६ | १ | | | | | | | | | | ब | कर्णबधीरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता Deaf (D), Hard of hearing (H H) | १ |

**ब)** **शासन शुध्दीपत्रक क्रं संकीर्ण २०२०/प्रक्र ९९/आस्था ८ दिनांक २० ऑगस्ट २०२१ नुसार व शासन पत्र दिनांक २० ऑगस्ट२०२१ नुसार सामाजिक व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गाचे आरक्षण रद्य झाल्याने खुल्या प्रवर्गातील वाढ झालेल्या समांतर आरक्षणाच्या प्रवर्गासाठी खालीलप्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहे.**

**<u>अनुसूचित क्षेत्राबाहेरील (बिगर पेसा)</u>**

| अ.क्र. | संवर्ग | प्रवर्ग | खुला | एकूण पद |
|---|---|---|---|---|
| १ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | खुला (सर्वसाधारण) | ०१ | ०१ |
| २ | आरोग्य सेवक (पुरुष) ४० टक्के | खुला (माजी सैनिक) | ०१ | ०१ |
| ३ | आरोग्य सेवक (पुरुष) ५० टक्के हंगामी फवारणी | खुला (खेळाडू) | ०१ | ०१ |
| | | खुला (प्रकल्पग्रस्त) | ०१ | ०१ |

**ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | दिव्यांग व वाढ झालेल्या खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने अर्ज व परीक्षा शुल्क भरण्याचा कालावधी | दिनांक १ सप्टेंबर २०२१ ते २१ सप्टेंबर २०२१ |
| २ | SEBC व दिव्यांग प्रवगातून पूर्वी अर्ज सादर केलेल्या उमेंदवारांना विकल्प व परीक्षा शुल्क सादर करण्याचा कालावधी | दिनांक १ सप्टेंबर २०२१ ते १४ सप्टेंबर २०२१ |

पदभरतीकरिता दिनांक ६/३/२०१९ रोजीची सविस्तर जाहिरात , दिनांक १४/६/२१ व दिनांक २० /८/२०२१ च्या शासन निर्णया प्रमाणे सामाजिक व आर्थीकदृष्टया SEBC मागास प्रवर्ग रद्य झाल्याने खुल्या प्रर्वगात अंतर्गत नव्याने वाढलेल्या समांतर आरक्षणाच्या प्रर्वगाची व दिव्यांग पदभरतीची सविस्तर जाहिरात व जाहीर प्रगटन https://aurangabad.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज सादर करण्यापूर्वी तसेच विकल्प सादर करण्यापूर्वी उमेदवारांनी सविस्तर जाहिरात व जाहीर प्रगटनामध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक वाचन करुन अर्ज / विकल्प सादर करावेत. दि.३.३.२०१९ रोजीच्या जाहिरातीमधील सर्व शर्ती अटी कायम राहतील.

भरती प्रक्रिया / परीक्षा स्थगित करणे किंवा रद्य करणे , अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण अथवा संवर्गनिहाय पदसंख्येमधे वाढ किंवा घट करण्याचे अधिकार अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी, जिल्हा निवड समिती तसेच नियुक्ती प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद औरंगबाद यांना राहतील. याबाबत उमेदवारांना कोणताही दावा सांगता येणार नाही, किंवा वाद उपस्थित करता येणार नाही.

टीप-१) **शारीरिकदृष्टया दिव्यांग व्यक्तीसाठी ४ टक्के आरक्षण व दिव्यांगाचे नवीन प्रवर्ग निश्चित करण्यात आल्यानुसार व सामाजिक व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गाचे आरक्षण रद्य झाल्याने खुल्या प्रवर्गातील वाढ झालेल्या समांतर आरक्षणाच्या प्रवर्गासाठी वर नमूद (अ ) व (ब) मध्ये दर्शविण्यात आलेल्या पदांसाठी अर्ज स्वीकारले जातील.**

**२)ज्या उमेदवारांनी सन २०१९ मधील जाहिरातीनुसार SEBC प्रवर्गासाठी अर्ज सादर केले आहेत, त्यांनी नव्याने अर्ज सादर करु नये. मात्र या जाहिरातीद्वारे नव्याने अधिसूचित केलेल्या EWS पदावर पात्र असल्यास अशा उमेदवारांना नवीन प्रवर्गासाठी विकल्प सादर करता येईल.**

ठिकाण औरंगाबाद
दिनांक २५.८.२०२१

स्वाक्षरीत /–
**सदस्य सचिव**
तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद औरंगबाद

स्वाक्षरीत /–
**सदस्य, जिल्हा निवड समिती**
तथा,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद औरंगबाद

स्वाक्षरीत /–
**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती**
तथा,
जिल्हाधिकारी, औरंगाबाद